डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा. क्र./बार्टी/सीव्हीसी/२०२०-२१/५५९९ दिनांक:२९/१२/२०२०

प्रति,

**अध्यक्ष/सदस्य/सदस्य सचिव,**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)**

**विषय : जात प्रमाणपत्र पडताळणीकरता अर्ज स्वीकारण्याबाबत.**

**संदर्भ :** दिनांक २९/१२/२०२० रोजी ऑनलाईन प्रणालीचा तात्पुरत्या स्वरुपात मंदावलेला वेग.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दिनांक २९/१२/२०२० रोजी निवडणूक विषयक प्रकरणाच्या अर्जदारांची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याने व ऑनलाईन प्रणालीचा वेग मंदावलेला असल्याने विविध जिल्हयांतून अर्जदार, लोकप्रतिनिधी तसेच समिती कार्यालयाकडून याबाबत ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्वीकृती करणेबाबत विनंती केलेली आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये बहुतांशी जिल्हयातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक सुरु आहे त्या करता उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राची/जात वैधता प्रमाणपत्र प्रस्ताव दाखल केलेल्या पावतीची आवश्यकता असल्याने तसेच अर्जदारांची गैरसोय होवू नये म्हणून त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. दिनांक २९/१२/२०२० व ३०/१२/२०२० केवळ या दोन्ही दिवशीच अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात यावीत.
२. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी व आवश्यकतेप्रमाणे पोलिस विभागास संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही करावी.
३. अर्जदारांची संख्या विचारात घेता आवश्यकतेनुसार अर्ज स्वीकारण्याचा टेबल/खिडकी वाढवण्यात यावी.
४. अर्जदारांची संख्या विचारात घेता कार्यालय पुर्ण वेळ तसेच आवश्यकतेप्रमाणे सर्व अर्जदारांचे अर्ज स्वीकारेपर्यंत दोन्ही दिवशी कार्यालय सुरु ठेवावीत.
५. ज्या अर्जदारांचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज दिलेले आहे त्यांचे सोबत खालीलप्रमाणे तक्त्यात माहिती दिनांक ०१.०१.२०२१ रोजीपर्यंत पाठविण्यात यावीत.

६. कोणत्याही प्रकारचे अनियमितता तसेच गैरकृत्याबाबत या कार्यालयाकडे तसेच शासनाकडे अर्जदाराची तक्रार होणार नाही याची दक्षता घेवून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | रजिस्टर नंबर/पावती नंबर | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(मेघराज भाते)

मा. महासंचालक यांचे मान्यतेने

प्र.उपायुक्त तथा प्रकल्प संचालक (सीव्हीसी)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.विभागीय आयुक्त, सर्व
३. मा. महासंचालक यांचे स्वीय सहाय्यक, बार्टी पुणे.

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
१. मा.जिल्हाधिकारी, सर्व.
२. उपविभागीय अधिकारी, सर्व.
३. तहसिलदार, सर्व.